# असे करा शंखी गोगल गायचे व्यवस्थापन....

**शबरी कृषी प्रतिष्ठान,**
**कृषी विज्ञान केंद्र**
**सोलापूर-1**

सध्यपरिस्थितीमध्ये ब-याच ठिकाणी सोयाबीन, उडीद, मुग, तुर, भाजीपाला व विविध फळ पिकामध्ये गोगल गाय व पैसा या किडींचा प्रादुर्भाव मोठया प्रमाणात दिसून येत आहे. सोयाबीन, उडीद या सारख्या पिकामध्ये रोप अवस्थेत गोगल गाय व पैसा किडींचा प्रादुर्भाव होत असल्याचे दिसून आले आहे.







- सायंकाळी किंवा सुर्योदयापूर्वी शेतीतील गोगलगायी गोळाकरून साबणाच्या अथवा मिठाच्या पाण्यात बडवून मारावयात किंवा शेतातून मोठया शंखी गोगलगायी जमा करून प्लॉस्टिकच्या पोत्यात भरून त्यात कोरडे मीठ अथवा चुना टाकून त्या पोत्याचे तोंड उघडे न ठेवता घट्ट बंद करावे. जेणेकरून त्यामध्यील गोगलगायी पोत्यातून बाहेर न जाता मिठाच्या किवा चुन्याच्या संपर्कात येऊन आत मध्ये मरून जातील.
- शेताचे बांध स्वच्छ ठेवावे.
- शेतामध्ये 7 ते 8 मीटर अंतरावर विविध ठिकाणी वाळलेल्या गवताचे किंवा भाजीपाला पिकाच्या अवशेषाचे ढीग अथवा गोणपाट गुळाच्या पाण्यात ओले करून शेतात ठिक ठिकाणी ठेवावेत. गोगलगायी त्या ठिकाणी आश्र्रयाला जातात. सूर्योदयानंतर त्याखालील गोळा झालेल्या गोगलगायी व त्यांची अंडी गोळा करून मिठाच्या पाण्यात टाकून नष्ट करावयात.
- शेतामध्ये किंवा बागेच्या सभोवती बांधापासून आत तंबाखू भुकटीचा अथवा मोरचूद किंवा कळीचा चूना 2:3 या प्रमाणात मिसळून त्याचा राखेवर पट्टा गोगलगायींना शेतात जाण्यास प्रतिबंध म्हणून व नियंत्रणासाठी टाकावा.
- गोगलगायीच्या नियंत्रणासाठी मेटाल्डिहाईड (स्नेलकिल) दाणेदार दोन किलो प्रति एकरी या प्रमाणात शेतात पसरून द्यावे.
- जर वरील उपाय जास्त खर्चीक वाटत असेल तर पुढीलप्रमाणे अमिष तयार करून शेतामध्ये टाकून द्यावे. 10 लिटर पाण्यामध्ये दोन किलो गुळ अधिक 25 ग्रॅम यीस्ट यांचे द्रावण तयार करावे. हे द्रावण 50 किलो गव्हाच्या कोंडयात टाकून चांगले मिसळावे. 10 ते 12 तास हे मिश्र्रण आंबवण्यासाठी ठेवावे. त्यानंतर त्यामध्ये थायमिथोक्झाम 50 ग्रॅम चांगल्या प्रकारे मिसळावे. हे अमिष शेतामध्ये ढिगा-या स्वरूपात किंवा बांधाच्या कडेणे पट्टा स्वरूपात टाकावे.

**अधिक माहितीसाठी संपर्क श्री. समाधान जवळगे शास्त्रज्ञ (पीक संरक्षण) के.व्ही.के. सोलापूर,मो. क्र. :८०८७३५९२५३**